<u>संक्षिप्त फौ. ख. क्रं. ९२/ २०२२</u>
<u>सरकार –वि.– लखन</u>
<u>नि.क्रं. २ खाली .</u>

<u>सरकार तर्फे साक्षीदार क्रं. २ यांची जबानी</u>

मी याव्दारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

| | | |
|---|---|---|
| माझे नांव | – | मंगेश अशोक चंदणखेडे, |
| वय | – | २५ वर्षे, |
| व्यवसाय | – | शेती, |
| राहणाार | – | हत्तीबोरी, ता. भिवापुर, जिल्हा– नागपूर. |

**<u>सरतपासणी–सहायक सरकारी अभियोक्ता श्री. व्ही. यु. मिरचे यांचे मार्फत</u> –**

१. दिनांक १२.०१.२०२२ रोजी पोलीसांनी मला कोठेच बोलविले नव्हते. पोलीसांनी माझ्यासमक्ष पंचनाम्याची कारवाई केली नव्हती. पोलीसांनी मला सुचनापत्र दिले नव्हते. आता मला निशाणी ३ वरील सुचनापत्र व निशाणी ४ वरील घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर मला माहीत नाही. अपघातासंदर्भात मला काहीही माहीत नाही.

**<u>सरतपास संपला.</u>**

**सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी साक्षीदारास उलट तपासात विचारण्याजोगे प्रश्न विचारण्यास परवानगी मागितली. परवानगी देण्यात आली.**

**उलट तपास – सरकार तर्फे**

२. हे म्हणणे खरे नाही की दिनां क१२.०१.२०२२ रोजी पोलीसांनी मला नक्षीशिवरात पंचनाम्याकरीत बोलविले होते. हे म्हणणे खरे नाही की पोलीसांनी माझ्यासमक्ष पंचनामा तयार केला होता. हे म्हणणे खरे नाही की पोलीसांनी पंचनामा मला वाचुन दाखविला व माझी सही घेतली. मी दुसरा पंच शंकर भोपे याला ओळखत नाही. हे म्हणणे खरे नाही की पंचनामा करतेवेळी दुसरा पंच हजर होता. हे म्हणणे खरे नाही की मी आरोपीला वाचविण्यासाठी खोटी साक्ष देत आहे.

**<u>उलट तपास आरोपी तर्फे त्यांचे वकील श्री. नागोशे यांचे मार्फत</u>**

३. नाकारला.

**<u>उलट तपास संपला.</u>**

**<u>फेरतपास नाही.</u>**

श्रवणोत्तर स्विकृत,
माझे समक्ष,
स्वा/-
( एस.जे. लाड )
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
भिवापूर.

दिनांक ०३.१०.२०२४.